(1)

ग्राम पंचायती मार्फत, जन्म, मृत्यु आणि वि.
नोंदणी

महाराष्ट्र शासन.
ग्राम विकास विभाग,
शासन निर्णय क्रमांकः व्हीपीएम २६६८/३०११०-ई,
सचिवालय, मुंबई- ३२, दिनांक : २१ डिसेंबर १९६८

शासन निर्णय :- १९५८ च्या ग्राम पंचायत कायद्यातील कलम ४५(१)मध्यें नमूद केल्याप्रमाणे व त्याच कायद्याच्या परिशिष्ठ १ मधील नोंद क्रमांक ५६ च्यातरतूदीनुसार शासनाने विशिष्ट वा सर्व-सामान्य आदेशानुसार विहित केलेल्या तक्त्यावरहुकूम जन्म, मृत्यू व विवाह यांची नोंदणी करणे हे ग्राम पंचायतीच्या अनेक कर्तव्यापैकी एक कर्तव्य आहे. सहकार आणि ग्राम विकास विभागाच्या निर्णय क्रमांकः व्हीपीएस्- २४६१/४२६२६-ई, दिनांक १२ फेब्रुवारी १९६३ अन्वये अशा नोंदणीकरितां शासनाने निरनिराळे तक्ते ठरवूनदिले असून्ही निरनिराळ्या कारणास्तव या कामाची अंमलबजावणी करण्यास ब-याच जिल्ह्यातील ग्राम पंचायती असमर्थ ठरल्या आहेत. त्यामुळें राज्याच्या निरनिराळ्या विभागांत हे काम तलाटी, पोलीस पाटील वगैरे सारख्या पदाधिका-यामार्फत अद्यापही चालूं आहे. विवाह, जन्म व मृत्यु रजिस्टर मधील नोंदी व जीवन विषयक आंकडेवारी या बाबी अतिशय महत्वाच्या असल्याकारणाने ही रजिस्टरें योग्य त-हेने व काटेकोरपणे ठेवणे हे फार अगत्याचे आहे. कारण या रजिस्टरांमधील जन्म - मृत्युच्या तारखासंबंधीचे उतारे ही निरनिराळ्या कामासाठी खात्रीशीर माहिती म्हणून दाखल करावी लागते. म्हणून या सर्व प्रश्नाचा सखोल विचार राज्याच्या निरनिराळ्या संबंधित खात्यांशी शासनाने केला आहे आणि १९५८ च्या मुंबई ग्राम पंचायत कायद्यातील कलम ४५(१) व त्याच कायद्याच्या परिशिष्ट १ मधील नोंद क्रमांक ५६चे अनुसार व सहकार आणि ग्राम विकास खात्याचे शासन आज्ञा व्हीपीएस- २४६१/४२६२६-ई, दिनांक १२ फेब्रुवारी १९६३ ही रद्द करून शासन आता खालील प्रमाणे आदेश देत आहे :-

(अ) ग्राम पंचायतीच्या ठेवावयाच्या इतर कागदपत्राबरोबरच ग्राम पंचायत सचीवाने जन्म, मृत्यु, उपजत मृत्यु आणि विवाह नोंदणीची रजिस्टरे ठेवावीत.

(ब) जन्म, मृत्यु, उपजत मृत्यु व विवाह यांची माहिती गांव कोतवालाने ग्राम पंचायत सचिवास पुरवावी.

(क) या शासन निर्णयास जोडलेल्या परिशिष्ट १ मधील फॉर्म अ, ब, क आणि ड प्रमाणे नोंदणी महसुली गांववार करण्यात यावी (म्हणजेच प्रत्येक महसुली गावांसाठी एक स्वतंत्र रजिस्टर ठेवावे). नोंदणी करतांना सदरहू शासन निर्णयास जोडलेल्या परिशिष्ट २ मध्ये दिलेल्या सूचनांचे पालन करावे.

एच- ११३२(१००० २-१२-६८)

(ड) ग्राम पंचायतीच्या सचिवानें ठेवलेल्या रजिस्टरांतील प्रत्येक महिन्याच्या उताऱ्याच्या दोन
पूढील महिन्याचे ५ तारखेच्या आंत संबंधीत गट विकास अधिकारी यांजकडे पाठवाव्या. एखाद्या
यांत एखाद्या महिन्यांत जन्म, मृत्यु, उपजत मृत्यु, उपजत-मृत्यु व विवाह यांच्या कांहीही नोंदी
या नसतील तरीही त्याने सदरहू गावांचे उतारे "नोंद नाही"असा शेरा मारुन पाठवावयाचे
सतात हे त्याने ध्यानात ठेवावे. असा उतारा आल्यानंतर गट विकास अधिकारी यांनी १ प्रत
पणाकडे ठेवून २री प्रत सहाय्यक आरोग्य संचालक प्रभारी जीवन विषयक आंकडेवारी विभाग, पुणे १
कडे त्याच महिन्याच्या १२ तारखेपर्यंत पाठवावी व त्या प्रतीच्या उपरी पत्राची एक प्रत संबंधीत
रोग्य अधिकारी जिल्हा परिषद यांचेकडेही रवाना करावी. गट विकास अधिकारी यांनि त्यांना
ळालेल्या उताऱ्यावरुन गांववार माहिती संकलित करावी व आलेले उतारे कायमचे कागदपत्र
मजून जपून ठेवावेत, तसेच त्याने परिशिष्ठ १ मध्ये दाखविल्याप्रमाणे आवक नोंदणी रजिस्टर ठेवावे.
पंचायत सचिवाकडून मिळालेले उतारे मे. सहाय्यक आरोग्य संचालक, प्रभारी जीवन विषयक
कडेवारी विभाग, पुणे १ यांचेकडे पाठवितांना, गट विकास अधिकारी यांनी स्वतःच्या अमलाखालील
भागातील गांव/तालुका/गट यांचे क्षेत्रफळात काही फेरफार झालेले असतील तर ते कळवावेत.

वरील व्यवस्था १ एप्रिल १९६९ पासुन अमलांत आणण्यात यावी. आज पर्यंत पोलिस
पाटील, तलाठी आदि पदाधिकारी यांचेकडे ही रजिस्टरे ठेवण्याचे जे काम होते ते दिनांक ३१ मार्च
१९६९ पासून बंद करण्यांत यावे.

२. जरी ही माहिती पुरविण्याची जबाबदारी गांव कोतवालावर सोपविलेली असली तरी लोकांचे प्रतिनिधी या नात्याने ग्राम पंचायतीतील सभासदांनासुध्दा सदरहू कामी सहाय्य देणे शक्य होईल असे शासनास वाटते. जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांना असे सुचविण्यांत येते की त्यांनी सर्व गट विकास अधिकाऱ्यांना सुचना द्याव्यात की, गट विकास अधिकाऱ्यांनी प्रत्येक ग्राम पंचायतीच्या सभासदांना एक पत्र पाठवून या कामाचे महत्व त्यांना पटवून द्यावे व त्यांना त्यांचे विभागांत झालेल्या जन्म, मृत्यु, उपजत मृत्यु व विवाह यांची माहिती ग्राम पंचायत सचिवास पुरविण्यास विनंती करण्यांत यावी. ग्राम पंचायत सचिव यांनाही त्यांच्या जबाबदारीबद्दल जाणीव देण्यात यावी आणि त्यांना असे कळविण्यांत यावे की त्यांनी जन्म, मृत्यु, उपजतमृत्यु व विवाह यांची एकही नोंद न वगळता घडलेल्या सर्वच्यासर्व घटनांच्या नोंदी होतील यासाठी योग्य ती खबरदारी घ्यावी. जरुर तर स्थानिक व्यक्ती व संस्था यांचाही यासाठी उपयोग करुन घ्यावा.

३. सहाय्यक आरोग्य संचालक (प्रभारी जीवन विषयक आकडेवारी विभाग)पुणे, यांना विनंती करण्यात येते की, त्यांनी दोन्ही परिशिष्टांच्या प्रती सर्व जिल्हा परिषदांच्या मुख्य कार्यकारी अधिकारी व सर्व गट विकास अधिकारी यांना त्वरित पाठवाव्यात. तसेच सहाय्यक आरोग्य संचालक, प्रभारी

जीवन विषयक आंकडेवारी, पुणे यांनी सदर तक्ते हे प्रमाणीत तक्ते म्हणून छापून मिळावे. यासाठी शासनाच्या नगर विकास आरोग्य व गृह निर्माण विभागाकडून मंजूरी घ्यावी आणि ग्राम पंचायतींच्या मागणीप्रमाणे गट विकास अधिकारी यांचे मार्फत त्यांचा पुरवठा करण्याचीही व्यवस्था करावी. अर्थातच छपाईच्या कामास अवधि लागणार असल्याने छापील फॉर्मस् उपलब्ध होईपर्यंत गट विकास अधिकाऱ्यांनी परिशिष्ठ १ व २ मधील फॉर्म् व सूचना आपले कार्यालयातूनच (मराठीमध्यें) चक्रमुद्रीत करुन घ्याव्यांत आणि त्या ग्राम पंचायतीना पुरवाव्यांत.

५. पुढील: अधिकारी हे सदर रजिस्टरांचे तपासणी अधिकारी राहतील.

१) विस्तार अधिकारी (ग्राम पंचायती)

२) गट विकास: अधिकारी

३) प्रशासकीय अधिकारी, जिल्हा परिषद.

४) उप- मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

५) जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा परिषद.

६) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.

७) सहाय्यक आरोग्य संचालक, (प्रभारी जीवन विषयक आंकडेवारी विभाग, पुणे- १).

वरील अधिकाऱ्यांनी ग्राम पंचायतीचे भेटीचे वेळी सदरहू रजिस्टरे तपासावीत आणि ती योग्य रीतीने ठेवण्यांत आलेली आहेत की नाहीत याची खात्री करुन घ्यावी. /याशिवाय सांख्यिकी सहायक (जीवन विषय आंकडेवारी) आणि जिल्हा परिषदेचे व शासकीय आरोग्य विभागाचे कर्मचारी हे तपासणीसाठी जेव्हां रजिस्टरे मागतील तेव्हां ग्राम पंचायत सचीवाने ती त्यांना उपलब्ध करुन द्यावीत. /

६. सदरहू माहिती ग्रामपंचायत सचिवास पुरवीण्याची जबाबदारी ही कोतवालाची आहे. याबद्दलच्या सूचना महसूल व वन विभागानें महसूल अधिकाऱ्यामार्फत कोतवालांना द्याव्यात. त्या विभागाने सदरहू जबाबदारी कोतवालांच्या कामाच्या यादीमध्ये अंतर्भूत करण्याची कार्यवाही करावी. रेव्हेन्यु अकौंटस् मॅन्युअलमध्यें अंतर्गत असलेला गांवचा नमुना क्रमांक १४ रद्द करण्याची कार्यवाहीहि त्या विभागाने करावी व तसेच तलाठ्यांच्या कामासंबंधीच्या यादीमध्यें योग्य ती दुरुस्ती करावी.

७. या नवीन व्यवस्थेला जास्तीत जास्त प्रसिध्दी देणे अगत्याचे आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, यांनी आपापल्या क्षेतील गट विकास अधिकाऱ्यांना असे कळवावे कीं गावोगांवी दौंडीसह सर्व प्रसिध्दीच्या मार्गाचा अवलंब करुन या व्यवस्थेस प्रसिध्दी देण्यांत यावी व त्या योगे ही रजिस्टरे ठेवणे व त्यांत नोंदावयाची माहिती ग्रामपंचायत सचिवांना विनचूक कळविणे

किती महत्वाचे आहे हे जनमानसावर बिंबविण्यांत यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

वृ प्रभाकर,
उप सचिव, महाराष्ट्र शासन,
ग्राम विकास विभाग

प्रतः-

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
जिल्हा परिषदांचे सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व गट विकास अधिकारी,
आरोग्य संचालक, पुणे,
सर्व आरोग्य संचालक (प्रभारी जीवन विषयक आंकडेवारी विभाग) पुणे,
ग्राम पंचायत सेक्रेटरी ट्रेनिंग सेंटर्सचे सर्व मुख्य अधिकारी,
संचालक, प्रसिध्दी विभाग (प्रेस-नोटसाठी),
सामान्य प्रशासन विभाग,
महसूल व वन विभाग,
नगर विकास, आरोग्य व गृह निर्माण विभाग,
गृह विभाग,
ग्राम विकास विभागातील सर्व अधिकारी व शाखा.

—

एर्द- ११३२(१००० + २-१२-९८)